**एम.ए.सी. पी. नं.२९५ /२०१९**
**निशाणी क्रमांक ३०**

**सा. क्र. १ चा शपथेवर पुढील सरतपास अर्जदार तर्फे श्री के. टी मिरगे वकील**

६. मी दाखल केलेल्या कागदपत्रांची यादी नि. ३३ व ३४ सोबत नमुना अ-अ, दोषारोपत्राचा अहवाल, जबाब, घटनास्थळ पंचनामा यांच्या प्रमाणित प्रती दाखल केल्या आहेत. त्या **नि. ३६ ते ४०** ला आहेत.

**उलटतपास गैरअर्जदार क्र.२ तर्फे श्री. आर. एस चंद्रे वकील यांच्यामार्फतः-**

७. दोन्ही ट्रकने एकमेकांना धडक दिली. समोरुन येणा-या ट्रकने धडक दिल्यामुळे अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामुळे अंपगत्व येवुन मला काहीही त्रास होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघातापुर्वी क्लीनर म्हणुन काम करत होतो व रुपये ७००/- कमवत होतो हे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी अवाजवी नुकसान भरपाईची मागणी केली.

**उलटतपास गैरअर्जदार क्र.५ तर्फे श्री. आर. एस गंगाखेडकर वकील यांच्यामार्फतः-**

८. ज्या ट्रकने समोरुन धडक दिली तिचा क्रमांक मला आठवत नाही परंतु माझ्या प्रतिज्ञापत्रात लिहलेला क्रमांक बरोबर आहे. अपघाताच्या वेळी मी झोपलो होतो त्यामुळे अपघात नेमका कसा झाला हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला ३१% अंपगत्व आल्याचे खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, उपचारासाठी रुपये ८०,०००/- ९०,०००/- खर्च केले हे मी खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, विमा कंपनीकडुन जास्त नुकसान भरपाई मिळण्यासाठी मी खोटा अर्ज दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की अपघातामध्ये एम एच २६ एच ५३२६ या ट्रकचा समावेश नव्हता. मी साक्ष देतो ती खरी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष दिली व विमा कंपनीला विनाकारण पक्षकार केले.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHASHIKANT UDDHAV MAHADAR
Date: 2026.07.27 17:01:05 +0530

साक्षीदारास वाचून दाखविले व खरे असल्याचे कबूल केले.

दिनांक:- २७.०७.२०२६

**(श. उ. महादार)**
सदस्य,
मोटार अपघात प्राधिकारण,
औरंगाबाद